दै० [illegible]मानस दि० ०८/०१/२०२६

# राज्यातील 29 महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात 15 जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे. मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दै० महाराष्ट्र जनमुद्रा दि० ०८/०१/२०२६

# राज्यातील २९ महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० ठाणे वैभव दि० ०८।०१।२०२६

# भिवंडीत आचारसंहितेचे सहा गुन्हे दाखल; १२.६८ लाख रुपये जप्त

**भिवंडी:** भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या 2025-26 च्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर, निवडणूक विभागाने आचार संहितेच्या केलेल्या उपाययोजना अंतर्गत आतापर्यंत 6 गुन्हे दाखल केले आहेत. तर 12 लाख 68 हजार रुपये जप्त केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार भिवंडी मनपा निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष आचारसंहिता कक्षाची स्थापना करण्यात आली असून त्या अंतर्गत 24 तास टोल-फ्री क्रमांकावर तक्रारी नोंदवल्या जात आहेत.

आचारसंहितेचे काटेकोरपणे निरीक्षण करण्यासाठी या अधिकाऱ्यांच्या अंतर्गत एकूण 11 फ्लाइंग स्क्वॉड टीम, सात स्टॅटिक सर्व्हे टीम आणि 13 व्हिडिओ सर्व्हेलेंस टीम तैनात करण्यात आल्या आहेत. या टीम निवडणूक मोहिमा, बैठका आणि इतर उपक्रमांवर सतत लक्ष ठेवत आहेत. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, विविध पोलिस ठाण्यांमध्ये आचारसंहिता उल्लंघन केल्याप्रकरणी पथकांनी एकूण सहा गुन्हे दाखल केले आहेत. तर 12 लाख 68,900 रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

आचारसंहितेचे पालन होते का यावर लक्ष ठेवण्यासाठी मनपाच्या पाच प्रभाग समिती कार्यालयानुसार पाच सहाय्यक नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भिवंडी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील खोली क्रमांक 409 मध्ये अतिरिक्त आयुक्त आणि आचारसंहिता नोडल अधिकारी विठ्ठल डाके यांच्या देखरेखीखाली आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आली.

शहरात अनेक ठिकाणी निवडणूक कार्यालयाची परवानगी न घेता खाजगी जागेत उमेदवारांनी कार्यालये सुरु केली आहेत. त्यांची तपासणी केली जात नाही. काही दिवसांपूर्वी भंडारी चौकात उमेदवाराच्या कार्यालयासमोर हाणामारी झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयाची परवानगी नसल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामुळे सर्व उमेदवारांच्या कार्यालयाच्या परवानगीची तपासणी करण्याची मागणी मतदारांकडून होत आहे. तसेच काही वार्डात-प्रभागात जेवणावळी सुरु असतात. अनेक कार्यालये दिलेल्या वेळेपेक्षा रात्रभर उघडे असतात. त्यामुळे देखील परिसरात चुकीच्या व आचारसंहिता भंग करण्याच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे फिरत्या पथकाद्वारे शहरात निघणाऱ्या प्रचार रॅलीचा व आचारसंहिता पालनासाठी उमेदवारांचा आढावा घेणे आवश्यक असून शहरातील शांतताभंग होणार नाही, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

दै० सागर दि० ०८।०१।२०२६

# भिवंडीत आचारसंहिता पथकाने केले १२ लाख जप्त

**भिवंडी :** भिवंडी शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रचाराची रणधुमाळी जोमात सुरू झाली असुन भाजप, काँग्रेस, शिवसेना, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस सह विविध राजकीय पक्ष, कोनार्क विकास आघाडी, भिवंडी विकास आघाडी, अपक्ष उमेदवारांनी दिवस व रात्री गुपचूप प्रचार बैठका घेत प्रचार करीत आहेत. अर्थ कारण व जेवणावळ सुरू झाली आहे. त्यामुळे पोलीस व निवडणूक यंत्रणा सतर्कपणे काम करीत उमेदवारांवर लक्ष ठेवून आहेत. भिवंडी शहर महानगरपलिका, सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची घोषणा निवडणूक आयोगाने केली असुन भिवंडी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या निर्देशानुसार अतिरीक्त आयुक्त तथा आचारसंहिता नोडल अधिकारी विठ्ठल डाके यांचे नियंत्रणाखाली आचारसंहिता कक्ष स्थापित करण्यात आला आहे. त्यासाठी समीर जवरे यांचेकडे (सहा. नोडल अधिकारी) प्रभाग समिती क्र.१ करिता मकसुम शेख, प्रभाग समिती क्र. २ करिता माणिक जाधव, प्रभाग समिती क्र.३ करिता सुरेंद्र भोईर, प्रभाग समिती क्र. ४ करिता गिरीधर घोष्टेकर, प्रभाग समिती क्र. ५ करिता सईद चिवणे यांचेकडे संबंधित प्रभाग समित्यांचे आचारसंहिता पथक प्रमुख ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होणेच्या दृष्टीने संबंधित आचारसंहिता पथक प्रमुख यांचे अधिपत्याखाली ११ भरारी पथके (त्रद्ध), ७ स्थिर सर्वेक्षण पथके (ड्द्ध) व १३ व्हिडिओ सर्विलिअन्स पथके (तद्ध) तैनात करण्यात आली आहेत.

भिवंडी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारत, रुम नं.४०९ या ठिकाणी आचारसंहिता कक्ष स्थापित असुन, नागरीकांना तक्रारीसाठी २४ तास टोल फ्री क्र. १८००२३३११०५, दुरध्वनी क्र. (०२५२२)-२२९९५९ व ई-मेल लपलाल.शश्रश.ललसारळश्र.लो ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असुन, त्यावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करुन तक्रारींचे निवारण करण्यात येत असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.आचारसंहिता भंगाचे विविध पोलीस स्टेशनमध्ये पथकामार्फत एकुण ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच रोख रक्कम रु.१२,६८,९०० इतकी रक्कम जप्त करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाने दिली.आचारसंहिता भंगाबाबत तक्रार असल्यास टोल फ्री नं. वर संपर्क साधावा असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांनी नागरीकांना केले आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० जागरूक टाइम्स दि० ०८/०१/२०२६

भिवंडी मनपा चुनाव

# आचार संहिता पर कड़ी नजर, छह मामले दर्ज

▶▶ 12 .68 लाख रुपए जब्त

▶▶ आचार संहिता कक्ष स्थापित

**जागरूक टाइम्स संवाददाता**

**भिवंडी।** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका की सार्वत्रिक चुनाव 2025-26 की घोषणा के बाद चुनाव आचार संहिता के प्रभावी क्रियान्वयन के लिए प्रशासन ने कड़े कदम उठाए हैं। राज्य चुनाव आयोग के निर्देशानुसार और चुनाव अधिकारी तथा आयुक्त अनमोल सागर के मार्गदर्शन में अतिरिक्त आयुक्त एवं आचार संहिता नोडल अधिकारी विठ्ठल डाके के नियंत्रण में विशेष आचार संहिता कक्ष की स्थापना की गई है। आचार संहिता के पालन पर नजर रखने के लिए समीर जवरे को सहायक नोडल अधिकारी नियुक्त किया गया है। इसके साथ ही प्रभाग समिति स्तर पर आचार संहिता पथक प्रमुखों की नियुक्ति की गई है। प्रभाग समिति क्रमांक 1 के लिए मकसुम शेख, प्रभाग समिति क्रमांक 2 के लिए माणिक जांधव, प्रभाग समिति क्रमांक 3 के लिए सुरेंद्र भोईर, प्रभाग समिति क्रमांक 4 के लिए गिरीधर घोष्टेकर तथा प्रभाग समिति क्रमांक 5 के लिए सईद चिवणे को यह जिम्मेदारी सौंपी गई है। आचार संहिता की सख्ती से निगरानी के लिए इन अधिकारियों के अधीन कुल 11 फ्लाइंग स्क्वॉड टीम (FST), 7 स्थिर सर्वेक्षण टीम (SST) और 13 वीडियो सर्विलांस टीम (VST) तैनात की गई हैं। ये टीमें चुनाव प्रचार, सभाओं और अन्य गतिविधियों पर लगातार नजर रख रही हैं। भिवंडी मनपा की मुख्य प्रशासकीय इमारत के कक्ष क्रमांक 409 में आचार संहिता कक्ष स्थापित किया गया है। प्रशासन की ओर से दी गई जानकारी के अनुसार अब तक आचार संहिता उल्लंघन के मामलों में विभिन्न पुलिस थानों में पथकों द्वारा कुल 6 अपराध दर्ज किए गए हैं। इसके साथ ही 12 लाख 68 हजार 900 रुपए की नकद राशि जब्त की गई है। चुनाव अधिकारी तथा आयुक्त अनमोल सागर ने नागरिकों से अपील की है कि यदि कहीं भी आचार संहिता का उल्लंघन होता दिखाई दे, तो वे बिना संकोच टोल फ्री नंबर या अन्य माध्यमों से शिकायत दर्ज कराएं, ताकि निष्पक्ष और शांतिपूर्ण चुनाव सुनिश्चित किया जा सके।



Scanned with OKEN Scanner

दै० सकाळ दि० ०९/०१/२०२६

# निवडणूक प्रचारात कार्यकर्त्यांचा राडा

## भाजप-कोणार्क विकास आघाडीत वाद

भिवंडी, ता. ८ (वार्ताहर) : शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, बुधवारी (ता. ७) रात्री कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजप समर्थकांनी शिरून गोंधळ घातल्याची घटना घडली. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात ही घटना घडली असून, याप्रकरणी निजामपूर पोलिस ठाण्यात दोन्ही गटांकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

प्रभाग क्रमांक १मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील, विलास पाटील, नेहा काटवले आणि मयूरेश पाटील यांची परवानगी घेऊन कॉर्नर सभा सुरू होती. या वेळी भाजप आमदार महेश चौघुले यांचे समर्थक आणि उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील यांच्यासह १० ते १२ कार्यकर्त्यांनी सभेत शिरून महिलांना शिवीगाळ व धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे बंदोबस्तावर पोलिस हजर असतानाही हा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पाटील समर्थकांनी '११२' क्रमांकावर फोन केल्यानंतर अतिरिक्त पोलिस ताफा घटनास्थळी पोहोचला आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेनंतर प्रतिभा पाटील यांनी समर्थकांसह निजामपूर पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब केल्याचा आरोप करीत कार्यकर्त्यांनी पोलिस ठाण्याबाहेर निदर्शने केली. अखेर सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील आणि त्यांच्या समर्थकांवर गुन्हा दाखल झाला. त्यानंतर गुरुवारी सकाळी भावेश पाटील यांच्या तक्रारीवरून कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांवरही गुन्हा नोंदवण्यात आला.या घटनेवर प्रतिक्रिया देताना माजी महापौर प्रतिभा पाटील म्हणाल्या, की विरोधकांनी निवडणूक प्रचाराने लढवावी, गुंडगिरीने नाही. पोलिस सत्ताधारी आमदारांच्या दबावाखाली काम करीत आहेत.असा त्यांनी आरोप केला.

Scanned with OKEN Scanner

दै० नवराष्ट्र दि० ०८/०१/२०२६

# भाजपा आमदार समर्थकांवर गुन्हा दाखल

## भिवंडीत सभेत राडा; महिलांना शिवीगाळ, धमकी



▶ **भिवंडी (वा.)** भिवंडी शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांच्या सभेत घुसखोरी करत राडा घातल्याप्रकरणी भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या समर्थकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांच्या उपस्थितीत घडल्याने खळबळ उडाली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या वतीने माजी महापौर प्रतिभा पाटील, माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले आणि मयुरेश पाटील हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. बुधवारी (दि. ७) रात्री कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या कॉर्नर सभेदरम्यान भाजपा आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्यांचे १० ते १२ सहकारी सभेत घुसले. त्यांनी महिलांना अर्वाच्च शिवीगाळ करत धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. महिलांनी विरोधकांना जाब विचारला असता परिस्थिती अधिक तणावपूर्ण झाली.या प्रकरणात परस्पर विरोधी गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

दै० नवभारत दि० ०८/०१/२०२६

राजनीति : पूर्व मेयर ने लगाया सत्ता दुरुपयोग का आरोप

# भिवंडी में भाजपा विधायक के समर्थकों ने किया उपद्रव



## पुलिस स्टेशन में मामला दर्ज

■ भिवंडी, (सं.) भिवंडी मनपा प्रभाग क्रमांक 1 में कोणार्क विकास आघाडी प्रत्याशी पूर्व महापौर प्रतिभा पाटिल, पूर्व महापौर विलास पाटिल,नेहा काठवले, मयुरेश पाटिल की शाम 7 बजे कोंबड पाडा गणपती मंदिर परिसर में पुलिस मंजूरी लेकर चुनाव प्रचार सभा शुरू थी. चुनाव प्रचार सभा शुरू होने के दौरान भाजपा विधायक महेश चौघुले के करीब दर्जन भर समर्थकों ने सभा में घुसकर महिलाओं को अभद्र भाषा और धमकाने का मामला निजामपुर पुलिस स्टेशन में दर्ज हुआ है. उक्त घटना प्रचार सभा की सुरक्षा में तैनात पुलिसकर्मियों की ड्यूटी के दौरान हुआ.उक्त घटना से समूचे क्षेत्र में भाजपा विधायक महेश चौगुले के खिलाफ लोगों का भारी आक्रोश पनपा है. मिली जानकारी के अनुसार,कोणार्क विकास आघाड़ी प्रत्याशी पूर्व मेयर प्रतिभा पाटिल,विलास पाटिल,मयूरेश पाटिल आदि प्रचार सभा कर रहे थे.



### पुलिस की टीम ने बिगड़े हुए हालात को संभाला

- सभा शुरू होने के दौरान ही भाजपा विधायक महेश चौगुले के करीबी भाजपा उत्तर मंडल अध्यक्ष भावेश पाटिल अपने करीब दर्जन भर समर्थकों को लेकर पहुंचे और मौजूद समर्थकों को अभद्र भाषा का प्रयोग करते हुए धमकाने लगे कि कोई भी कोणार्क विकास आघाड़ी उम्मीदवारों की मदद और वोटिंग नहीं करेगा अन्यथा अंजाम बहुत बुरा होगा.भाजपा विधायक महेश चौगुले के उपद्रवी समर्थकों की करतूत देखकर पूर्व मेयर प्रतिभा विलास पाटिल ने पुलिस कंट्रोल रूम को फोन कर पुलिस दल बुलाया तो पुलिस ने बिगड़े हालात को संभाला.
- पूर्व मेयर पाटिल अपने समर्थकों के साथ निजामपुर पुलिस स्टेशन गईं लेकिन आरोप है कि विधायक चौगुले की सत्ता की धमक के कारण पुलिस ने काफी देर तक शिकायत दाखिल करने में हीलाहवाली की, लेकिन नाराज महिलाओं द्वारा काफी शोर शराबा किए जाने के बाद पुलिस ने भाजपा समर्थकों पर मामला दाखिल किया लेकिन अभी तक कोई गिरफ्तारी नहीं हुई है.

Scanned with OKEN Scanner

दै. आपलं महानगर दि. ०८/०१/२०२५

# कोणार्क विकास आघाडीच्या सभेत राडा

## दोघांकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल

आपलं महानगर वृत्तसेवा



▸ **वार्ताहर। भिवंडी।** शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील,माजी महापौर विलास पाटील,नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्याचा आरोप विरोधकांनी केला. या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती. तेव्हापासून या दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील आणि त्यांचे १० ते १२ साथीदारांनी सभेत शिरून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्याचा आरोप आहे.

यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना जाब विचारला. पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली. दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील यांनी आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलीस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तेथे पोलीस विलंब करू लागल्याने पाटील समर्थकांनी पोलीस ठाण्याबाहेर गदारोळ केला. त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील आणि त्यांचे समर्थक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनी सुद्धा कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांसह समर्थकांविरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै. नवा काळ दि. ०८/०१/२०२५

# भिवंडीमध्ये कोणार्क विकास आघाडीच्या महिला सभेत राडा

■ भिवंडी

**भिवंडी** शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवार व माजी महापौर प्रतिभा पाटील यांच्या महिला सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या समर्थकांनी गोंधळ घातला. पोलिसांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार चौघुले यांच्या समर्थकांवर दादागिरी व धमकावण्याचे आरोप केले. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात महिलांसोबत प्रचार सभा सुरू असतानाच आमदार चौघुले यांच्या समर्थकांनी सभेत घुसून महिलांना शिवीगाळ करत गोंधळ घातल्याचा आरोप कोणार्क विकास आघाडीने केला. यानंतर सभेतील महिलांनी विरोधकांना जाब विचारला. प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीविरोधात भाजपाने स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. या प्रभागात माजी महापौर विलास पाटील यांची पत्नी माजी महापौर प्रतिभा पाटील आणि मुलगा मयुरेश पाटील निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात आमदार महेश चौघुले यांनी मुलगा अमित चौघुले याला निवडणुकीच्या रिंगणात उतरवून भाजपाचे पॅनल उभे केले. २०१७ च्या निवडणुकीत हा प्रभाग भाजपाने कोणार्क विकास आघाडीसाठी सोडला होता.

Scanned with OKEN Scanner

दै० पुढारी दि० ०८/०१/२०२५

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत राडा

## परस्परविरोधी गुन्हे दाखल

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील प्रभाग क्र.१ मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदाराच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्याप्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान १० ते १२ जणांनी या सभेत शिरून महिलांना अर्वाच्च शिवीगाळ करत धमकावले. यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना 'तुम्ही येथे का आले' याचा जाब विचारला. शेवटी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली. रात्री उशिरा प्रतिभा पाटील यांनी समर्थक महिलांसह निजामपूर पोलीस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. मात्र तेथे विलंब झाल्याने पोलीस ठाण्याबाहेर गदारोळ झाला. त्यानंतर उशिरा सपना भोईर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. नंतर सकाळी कोणार्क विकास आघाडी उमेदवारांसह समर्थकांविरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल झाला आहे.

दै० लोकनायक दि० ०८/०१/२०२५

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजपा आमदार समर्थकांचा राडा

भिवंडी | शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील,माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले,मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊ. सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलाना शिवीगाळ करीत धमकावल्या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.हा सर्व राडा बंदोबस्ता वरील पोलिसांच्या उपस्थिती मध्ये सुरू होता हे विशेष. प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वा खाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० पुण्यनगरी दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीतील सभेत राडा; परस्परविरोधी गुन्हे

## सभेत भाजप समर्थकांची घोषणाबाजी

भिवंडी : शहरात कोणार्क विकास आघाडीची कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या सभेत भाजप आ. महेश चौघुले यांच्या १०-१२ समर्थकांनी घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्याप्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, कोणार्क आघाडीच्या समर्थकांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोणार्क विकास आघाडीविरोधात भाजपने आमदार महेश चौघुले यांच्या मुलाच्या नेतृत्वाखाली भाजपचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्याविरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती. तेव्हापासून या दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्यांचे १०-१२ साथीदार या सभेत शिरून महिलांना शिवीगाळ करीत धमकावू लागले. यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले, याचा जाब विचारला. यावेळी बंदोबस्तावरील पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली.दरम्यान, रात्री उशिरा प्रतिभा पाटील यांनी आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलीस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तेथे पोलीस विलंब करू लागल्याने पाटील समर्थकांनी पोलीस ठाण्याबाहेर गदारोळ केला. त्यानंतर उशिरा सपनाकुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील व त्यांच्या समर्थकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनीसुद्धा उमेदवारांसह समर्थकांविरोधात तक्रार दिल्याने परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै० नवशक्ती दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत भाजप आमदार समर्थकांचा राडा

**भिवंडी :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील, माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवला आहे.

हा सर्व राडा बंदोबस्ता वरील पोलिसांच्या उपस्थितीत सुरू होता. प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीविरोधात भाजपने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती.

तेव्हापासून या दोन गटात वाद आहे. कोणार्क विकास आघाडीची कॉर्नर सभा सुरू होती. आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्यांच्या साथीदारांनी महिलांना शिवीगाळ करीत धमकावू लागले.

Scanned with OKEN Scanner

दै० दैनिक भास्कर दि० ०८/०१/२०२६

# भिवंडी में भाजपा और कोणार्क विकास आघाडी समर्थक भिड़े

## 20 लोगों के खिलाफ मामला दर्ज



**भास्कर संवाददाता|** भिवंडी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस की चुनावी सभा के कुछ घंटे के बाद सभास्थल से कुछ ही दूरी पर भाजपा और कोणार्क विकास आघाडी के समर्थकों के बीच हिंसक झड़प हो गई। यह घटना भिवंडी के शिवाजी चौक के पास उस समय घटी जब कोणार्क विकास आघाडी की चुनावी सभा और प्रचार कार्य चल रहा था। इस मामले में पुलिस ने 20 लोगों के खिलाफ मामला दर्ज किया है। इस घटना के बाद इलाके में कुछ देर के लिएं दहशत का माहौल बन गया था। पुलिस के मुताबिक, स्थानीय कोंबडपाडा परिसर में स्थित गणपति मंदिर के पास बुधवार की रात कोणार्क विकास आघाडी पैनल के प्रत्याशी व पूर्व महापौर विलास पाटील, प्रतिभा पाटील, नेहा क़ाठवले और मयुरेश पाटील की चुनावी सभा आयोजित की गई थी। इसी दौरान भाजपा समर्थकों सहित करीब 10 से 12 लोगों ने नारेबाजी और प्रचार को लेकर विरोध जताया, जिसके बाद दोनों पक्षों में कहासुनी शुरू हो गई। देखते ही देखते विवाद ने उग्र रूप ले लिया और दोनों गुटों के समर्थक आपस में भिड़ गए। आरोप है कि झड़प के दौरान लाठी-डंडों से मारपीट की गई। इस दौरान कुछ वाहनों को नुकसान पहुंचा और सभा स्थल पर अफरा-तफरी मच गई। कुछ समय के लिए यातायात भी प्रभावित हुआ। जानकारी मिलते ही निजामपुरा पुलिस मौके पर पहुंची और स्थिति को नियंत्रित किया। मामला दर्ज किया है।

दै० हमारा महानगर

दि० ०८/०१/२०२६

# सभा के दौरान भाजपा और कोणार्क विकास आघाड़ी के समर्थक भिड़े, 20 पर केस

**भिवंडी।** भिवंडी महानगरपालिका चुनाव के तहत प्रभाग क्रमांक 1 में आयोजित चुनावी सभा के दौरान भाजपा और कोणार्क विकास आघाड़ी के समर्थकों के बीच हिंसक झड़प हो गई। यह घटना शिवाजी चौक के पास उस समय हुई, जब कोणार्क विकास आघाड़ी की चुनावी सभा और प्रचार कार्य चल रहा था। घटना के बाद इलाके में कुछ देर के लिए दहशत का माहौल बन गया।पुलिस के अनुसार,गणपति मंदिर कोंबडपाडा परिसर में कोणार्क विकास आघाड़ी पैनल के प्रत्याशी विलास पाटिल, प्रतिभा पाटिल, नेहा काठवले और मयुरेश पाटिल की चुनावी सभा आयोजित की गई थी। इसी दौरान भाजपा समर्थकों सहित करीब 10 से 12 लोगों ने नारेबाजी और प्रचार को लेकर विरोध जताया, जिसके बाद दोनों पक्षों में कहासुनी शुरू हो गई। देखते ही देखते विवाद ने उग्र रूप ले लिया।

Scanned with OKEN Scanner

दै० जनादेश दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजपा आमदार समर्थकांचा राडा; परस्पर विरोधी गुन्हे

प्रतिनिधी



भिवंडी, दि. ८ : शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील, माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊ‌न सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हा सर्व राडा बंदोबस्ता वरील पोलिसांच्या उपस्थिती मध्ये सुरू होता हे विशेष.

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वा खाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती. तेव्हा पासून या दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी (७) रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटीलव त्याचे १० ते १२ साथीदार या सभेत शिरून महिलाना अर्वाच्च शिवीगाळ करीत धमकावू लागले.यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले याचा जाब विचारला. विशेष म्हणजे या वेळी बंदोबस्ता वरील पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली. दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलिस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तेथे पोलिस विलंब करू लागल्याने पाटील समर्थकांनी पोलिस ठाण्या बाहेर गदारोळ केला. त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील व त्याचे समर्थक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दै० महाराष्ट्र जनमुद्रा दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजपा समर्थकांचा राडा, परस्पर विरोधी गुन्हे



**भिवंडी :** भिवंडी शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील,माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात भिवंडी निवडणूक विभागाची परवानगी घेऊन प्रचार रॅली करीत असताना भाजपाच्या आमदार १० ते १२ समर्थकांनी प्रचार रली सभेत घुसून महिलाना शिवीगाळ करीत धमकावल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असुन या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा भिवंडी निजामपूरा पोलीस ठाण्यात भाजप पदाधिकारी व समर्थकांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.हा सर्व राडा झाला. तेव्हा पोलीस बंदोबस्ता साठी उपस्थिती होते.

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदारांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वा खाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे.त्यामुळे गेल्या काही दिवसापासून तेथे दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी (७) रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदारचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्याचे १० ते १२ साथीदार या सभेत शिरून महिलाना अर्वाच्च शिवीगाळ करीत धमकावू लागले. यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले याचा जाब विचारला. विशेष म्हणजे या वेळी बंदोबस्ता वरील पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली.

दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलिस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील व त्याचे समर्थक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनी सुद्धा कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांसह समर्थकां विरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरोधकांनी निवडणूक लढवावी, प्रचार करून मत मागावीत, पण त्यासाठी गुंडगिरीचा मार्ग अवलंबून महिलांना शिवीगाळ करून अवमान केल्याचे दुःख होत असल्याची खंत माजी महापौर प्रतिभा पाटील यांनी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. ठाणे वैभव

दि. ०८/०१/२०२५

# भिवंडीतील कोंबडपाडा येथे प्रचार सभेत गोंधळ

**भिवंडी:** भिवंडीतील कोंबडपाडा येथील गणपती मंदिराजवळ सुरु असलेल्या निवडणूक प्रचार सभा सुरु असताना दोन विरोधी उमेदवारांच्या गटांमध्ये दमदाटी आणि शिवीगाळी करीत गोंधळ घातला. या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात दोघांनी परस्पर विरोधात तक्रारी दाखल केल्या आहेत.

शहरातील कोंबडपाडा भागात गणपती मंदिराजवळ कोणार्क विकास आघाडी पॅनलची निवडणूक प्रचारसभा काल बुधवार रोजी सायंकाळी आयोजित केली होती. या सभेच्या ठिकाणी विरोधी गटाच्या 10 जणांनी अपशब्द वापरुन आरडाओरड करीत गोंधळ घातला.

निवडणूक प्रचार प्रक्रियेत अडथळा निर्माण केल्याप्रकरणी सपना कुमार भोईर यांनी निजामपूर पोलीस ठाण्यात 10 जणांविरोधात तक्रार दाखल केली आहे. तर याच घटनेदरम्यान 10 जणांनी अंगावर धावत येऊन शिवीगाळ करीत धमकी दिल्याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात सुनील पाटील यांनी तक्रार दिली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० कोकण सकाळ दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजपा आमदार समर्थकांचा राडा

भिवंडी : शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील,माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊ. सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलाना शिवीगाळ करीत धमकावल्या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.हा सर्व राडा बंदोबस्ता वरील पोलिसांच्या उपस्थिती मध्ये सुरू होता हे विशेष.

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वा खाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती.

तेव्हा पासून या दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी (७) रात्री कॉर्नर सभा सुरू होती.या दरम्यान आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटीलव त्याचे १० ते १२ साथीदार या सभेत शिरून महिलाना अर्वाच्च शिवीगाळ करीत धमकावू लागले.यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले याचा जाब विचारला.विशेष म्हणजे या वेळी बंदोबस्ता वरील



पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली.त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली.

दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलिस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.तेथे पोलिस विलंब करू लागल्याने पाटील समर्थकांनीं पोलिस ठाण्या बाहेर गदारोळ केला.त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील व त्याचे समर्थक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनी सुद्धा कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांसह समर्थकां विरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विरोधकांनी निवडणूक लढवावी,प्रचार करून मत मागावीत,पण त्यासाठी गुंडगिरीचा मार्ग आमदारांनी अवलंबवावा याचे दुःख होत असल्याचे सांगत ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लाडक्या बहिर्णीसाठी झटत असताना भिवंडीत त्या सुरक्षित नाहीत याला भाजपा आमदार महेश चौघुले जबाबदार असल्याचे स्पष्ट करीत, पोलिस जाणीवपूर्वक सत्ताधारी आमदारांच्या दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप प्रतिभा पाटील यांनी केला आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० ठाणे वार्ता दि० ०८/०९/२०२५

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या सभेत भाजपा आमदार समर्थकांचा राडा

**भिवंडी :**

**शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील, माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात परवानगी घेऊन सुरू असलेल्या सभेत भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या १० ते १२ समर्थकांनी घुसून महिलाना शिवीगाळ करीत धमकावल्या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हा सर्व राडा बंदोबस्तावरील पोलिसांच्या उपस्थितीमध्ये सुरू होता हे विशेष.**

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदार महेश चौघुले यांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांनी आमदार महेश चौघुले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती. तेव्हापासून या दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी (७) रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदार महेश चौघुले यांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्याचे १० ते १२ साथीदार या सभेत शिरून महिलांना अर्वाच्च शिवीगाळ करीत धमकावू लागले. यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले याचा जाब विचारला. विशेष म्हणजे या वेळी बंदोबस्ता वरील पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी येथील परिस्थिती शांत केली.

**विरोधकांनी निवडणूक लढवावी, प्रचार करून मत मागावीत, पण त्यासाठी गुंडगिरीचा मार्ग आमदारांनी अवलंबवावा याचे दुःख होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लाडक्या बहिणींसाठी झटत असताना भिवंडीत त्या सुरक्षित नाहीत याला भाजपा आमदार महेश चौघुले जबाबदार असल्याचे स्पष्ट करीत, पोलिस जाणीवपूर्वक सत्ताधारी आमदारांच्या दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप प्रतिभा पाटील यांनी केला आहे.**

दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलिस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तेथे पोलिस विलंब करू लागल्याने पाटील समर्थकांनी पोलिस ठाण्याबाहेर गदारोळ केला. त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरून भावेश पाटील व त्याचे समर्थक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनी सुद्धा कोणार्क विकास आघाडीच्या उमेदवारांसह समर्थकां विरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै० सागर दि० ०८/०९/२०२५

# भिवंडीत कोणार्क विकास आघाडीच्या प्रचार रॅलीत भाजपा समर्थकांचा राडा

**भिवंडी :** भिवंडी शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर प्रतिभा पाटील, माजी महापौर विलास पाटील, नेहा काठवले, मयुरेश पाटील यांच्या कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात भिवंडी निवडणूक विभागाची परवानगी घेऊन प्रचार रॅली करीत असताना भाजपाच्या आमदार समर्थकांनी प्रचार रॅलीत घुसून महिलांना शिवीगाळ करीत धमकावल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असुन या प्रकरणी मध्यरात्रीनंतर उशिरा भिवंडी निजामपूरा पोलीस ठाण्यात भाजप पदाधिकारी व समर्थकांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हा सर्व राडा झाला तेव्हा पोलीस बंदोबस्तासाठी उपस्थित होते हे विशेष!

प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडी विरोधात भाजपाने आमदारांचा मुलगा मित चौघुले यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पॅनल उभे केले आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसापासून तेथे दोन गटात वाद आहे. कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात कोणार्क विकास आघाडीची बुधवारी रात्री कॉर्नर सभा सुरू होती. या दरम्यान आमदारांचे समर्थक उत्तर मंडळ अध्यक्ष भावेश पाटील व त्याचे १० ते १२ साथीदार या सभेत शिरून महिलांना अर्वाच शिवीगाळ करीत धमकावू लागले. यावेळी सभेतील महिलांनी विरोधकांना तुम्ही येथे का आले याचा जाब विचारला. विशेष म्हणजे या वेळी बंदोबस्तावरील पोलिसांनी कोणतीही भूमिका न घेतल्याने शेवटी पाटील समर्थकांनी ११२ क्रमांकावर फोन करून या राड्याची माहिती दिली. त्यानंतर आलेल्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती शांत केली.


दरम्यान रात्री उशिरा प्रतिभा पाटील आपल्या समर्थक महिलांसह निजामपूर पोलिस ठाण्यात दाखल होत विरोधकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. त्यानंतर उशिरा सपना कुमार भोईर यांच्या तक्रारीवरुन भावेश पाटील व त्याचे समर्थकांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर त्यानंतर सकाळी भावेश पाटील यांनी सुद्धा कोणार्क विकास आंघाडीच्या उमेदवारांसह समर्थकांविरोधात तक्रार दिल्याने परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरोधकांनी निवडणूक लढवावी, प्रचार करून मत मागावीत, पण त्यासाठी गुंडगिरीचा मार्ग अवलंबून महिलांना शिवीगाळ करून अवमान केल्याचे दुःख होत असल्याची खंत माजी महापौर प्रतिभा पाटील यांनी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० हमारी रफ्तार दि० ०९/०१/२०२६

# भिवंडी में कोणार्क विकास अघाड़ी की बैठक में बीजेपी विधायक समर्थकों का हंगामा, दोनों पक्षों पर मामले दर्ज

भिवंडी । फहीम अंसारी । शहर के वार्ड नंबर 1 में कोणार्क विकास अघाड़ी के उम्मीदवार, पूर्व मेयर प्रतिभा पाटिल, पूर्व मेयर विलास पाटिल, नेहा काठोले और मयुरेश पाटिल द्वारा कोंबडपाड़ा स्थित गणपति मंदिर परिसर में अनुमति लेकर आयोजित कॉर्नर मीटिंग के दौरान बीजेपी विधायक महेश चौगुले के 10 से 12 समर्थकों ने जबरन प्रवेश कर महिलाओं के साथ गाली–गलौज की और धमकियां दीं। इस मामले में आधी रात के बाद देर से एफआईआर दर्ज की गई। खास बात यह रही कि यह पूरा हंगामा पुलिस बंदोबस्त की मौजूदगी में हुआ।



वार्ड नंबर 1 में कोणार्क विकास अघाड़ी के मुकाबले बीजेपी ने विधायक महेश चौगुले के बेटे मीत चौगुले के नेतृत्व में पार्टी का पैनल उतारा है। कोणार्क विकास अघाड़ी के पूर्व मेयर विलास पाटिल ने विधानसभा चुनाव में विधायक महेश चौगुले के खिलाफ चुनाव लड़ा था, तभी से दोनों गुटों के बीच विवाद चला आ रहा है।

बुधवार (7 जनवरी) की रात कोंबडपाड़ा के गणपति मंदिर के पास कोणार्क विकास अघाड़ी की कॉर्नर मीटिंग चल रही थी। इसी दौरान विधायक महेश चौगुले के समर्थक, उत्तर मंडल के अध्यक्ष भावेश पाटिल अपने 10 से 12 साथियों के साथ मीटिंग में घुस आए और महिलाओं को अश्लील गालियां देते हुए धमकाने लगे। मौके पर मौजूद महिलाओं ने सवाल किया कि वे वहां क्यों आए हैं। हैरानी की बात यह रही कि ड्यूटी पर तैनात पुलिस ने कोई कार्रवाई नहीं की। इसके बाद पाटिल के समर्थकों ने 112 नंबर पर फोन कर हंगामे की सूचना दी। बाद में पहुंची पुलिस ने स्थिति को काबू में किया।

इसके बाद देर रात प्रतिभा पाटिल अपने महिला समर्थकों के साथ निजामपुर पुलिस स्टेशन पहुंचीं और विरोधियों के खिलाफ मामला दर्ज करने की मांग की। पुलिस द्वारा देरी किए जाने पर पाटिल के समर्थकों ने पुलिस स्टेशन के बाहर हंगामा किया। अंततः सपना कुमार भोइर की शिकायत पर भावेश पाटिल और उनके समर्थकों के खिलाफ मामला दर्ज किया गया। बाद में सुबह के समय भावेश पाटिल ने भी कोणार्क विकास अघाड़ी के उम्मीदवारों और समर्थकों के खिलाफ शिकायत दर्ज कराई, जिसके चलते दोनों पक्षों के खिलाफ परस्पर (क्रॉस) मामले दर्ज किए गए।

प्रतिभा पाटिल ने कहा कि विरोधियों को चुनाव लड़ने और वोट मांगने का पूरा अधिकार है, लेकिन इसके लिए गुंडागर्दी का रास्ता अपनाना निंदनीय है। उन्होंने आरोप लगाया कि एक ओर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'लाड़की बहनों' की सुरक्षा की बात कर रहे हैं, वहीं दूसरी ओर भिवंडी में महिलाएं सुरक्षित नहीं हैं, जिसके लिए बीजेपी विधायक महेश चौगुले जिम्मेदार हैं। साथ ही उन्होंने यह भी आरोप लगाया कि पुलिस जानबूझकर सत्ताधारी विधायक के दबाव में काम कर रही है।

Scanned with OKEN Scanner

दै० मुंबई चौफेर दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ; २६ जणांना घेतले ताब्यात

भिवंडी - महापालिकेच्या निवडणुकीनिमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्रीदरम्यान २६ तरुण मद्यधुंद अवस्थेत जमून त्यांनी शस्त्रे बाळगल्याबद्दल आणि लोकांमध्ये दहशत पसरवल्याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुणांचा समावेश असून, ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच ते कोंबडपाडा परिसरात कोणता गुन्हा करण्यासाठी आले होते, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील शस्त्रे जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली. वास्तविक शहरात अशा प्रकारच्या दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या घटना घडत असताना महापालिका निवडणूक विभागाचे आचारसंहिता पथक काय करते? अशा प्रकारची विचारणा शहरातील मतदार नागरिकांकडून केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जानेवारी रोजी रात्री १२:३० वाजताच्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच निजामपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. त्यांना २६ जण तरुण-युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुन्या वापरलेल्या तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. अशा वेळी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे जमाव जमविण्यास सक्त मनाई आहे.

दै० पुण्यनगरी दि० ०८/०१/२०२६

www.epunyanagari.com

# भिवंडीत शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ

## पोलिसांनी २६ जणांना घेतले ताब्यात

**भिवंडी** : महापालिकेच्या निवडणुकीनिमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्रीदरम्यान २६ तरुण मद्यधुंद अवस्थेत जमून त्यांनी शस्त्रे बाळगल्याबद्दल आणि लोकांमध्ये दहशत पसरवल्याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुणांचा समावेश असून ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच ते कोंबडपाडा परिसरात कोणता गुन्हा करण्यासाठी आले होते, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील शस्त्रे जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.

६ जानेवारी रोजी रात्री १२:३० वाजताच्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच निजामपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. त्यांना २६ जण तरुण-युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुन्या तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. अशा वेळी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे जमाव जमविण्यास सक्त मनाई आहे. असे असूनही, आरोपींनी बेकायदेशीरपणे जमून पोलीस प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उघडपणे उल्लंघन केले. निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ पोहोचून कारवाई करीत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करीत शस्त्रे जप्त केली आहेत.

दै० लोकमत दि० ०८/०१/२०२६

# दहशत पसरविणाऱ्या २६ जणांवर गुन्हा

**भिवंडी :** भिवंडीत निवडणूक आचारसंहितेचा भंग करत मद्यप्राशन करून तलवार नाचवत परिसरात दहशत केल्याप्रकरणी २६ जणांविरोधात निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या २६ जणांना पोलिसांनी नोटीस बजावत प्रतिबंधात्मक कारवाई केली.

शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिर परिसरात २६ जण दारू पिऊन परिसरात दहशत पसरवत असल्याची खबर निजामपुरा पोलिसांना मिळताच, पोलिसांनी धाड टाकत रोहित व्यंकटेश नेडिमेटला (२५ वर्ष रा.भिवंडी), दयाशंकर श्रीराम ताला (२७, रा.भिवंडी) याच्यासह त्याचे भिवंडी, आंबिवली, कल्याण व टिटवाळा परिसरातील इतर २४ जण अशा एकूण २६ जणांवर गुन्हे दाखल करत दोन तलवारी जप्त केल्या असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

दै० ठाणे जीवनदीप वार्ता दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ

## पोलिसांनी 26 जणांना ताब्यात घेतले आचार संहिता पथका ऐवजी पोलिसांनी केला गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक निमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्री दरम्यान २६ तरुण युवक मद्यधुंद अवस्थेत जमून त्यांनी शस्त्रे बाळगल्याबद्दल आणि लोकांमध्ये दहशत पसरवल्या प्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुण युवकांचा समावेश असून ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते ? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच ते कोंबडपाडा परिसरात कोणता गुन्हा करण्यासाठी आले होते याबाबत उलटसुलट चर्चा सुरु झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील शस्त्र जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.वास्तविक शहरात अशा प्रकारच्या दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या घटना घडत असताना महापालिका निवडणूक विभागाचे आचारसंहिता पथक काय करते? अशा प्रकारची विचारणा शहरातील मतदार नागरिकां कडून केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ६ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२:३० वाजताच्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच निजामपूरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले असता त्यांना २६ जण तरुण-युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुनी वापरती तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. अशा वेळी परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारे जमाव जमविण्यास सक्त मनाई आहे. असे असूनही, आरोपींनी बेकायदेशीरपणे जमून केवळ मनाई आदेशांचे उल्लंघन केले नाही तर पोलिस प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उघडपणे उल्लंघन केले. निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ पोहोचून कारवाई करीत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यामध्ये भिवंडी, कल्याण आणि आसपासच्या परिसरातील रहिवासी समाविष्ट आहेत. तसेच पोलिसांनी घटनेत वापरलेली लोखंडी शस्त्रे देखील जप्त केली. सदर आरोपी कोणाच्या इशाऱ्याने या ठिकाणी आले ? याचा तपास आचारसंहिता अधिकाऱ्यांनी पोलिसांमार्फत करावा,अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

दै० महाराष्ट्र जनमुद्रा दि० ०८/०१/२६

# भिवंडीत शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ, पोलिसांनी २६ जणांना ताब्यात घेतले

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक निमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्री दरम्यान २६ तरुण युवक मद्यधुंद अवस्थेत जमून त्यांनी शस्त्रे बाळगल्याबद्दल आणि लोकांमध्ये दहशत पसरवल्या प्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या

आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुण युवकांचा समावेश असून ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते ? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. तसेच ते कोंबडपाडा परिसरात कोणता गुन्हा करण्यासाठी आले होते याबाबत उलटसुलट चर्चा सुरु झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील शस्त्र जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे यांनी दिली.वास्तविक शहरात अशा प्रकारच्या दहशतीचे वातावरण निर्माण करण्याच्या घटना घडत असताना महापालिका निवडणूक विभागाचे आचारसंहिता पथक काय करते? अशा प्रकारची विचारणा शहरातील मतदार नागरिकां कडून केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ६ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२:३० वाजताच्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच निजामपूरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे हे पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले असता त्यांना २६ जण तरुण–युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुनी वापरती तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू आहे. अशा वेळी परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारे जमाव जमविण्यास सक्त मनाई आहे. असे असूनही, आरोपींनी बेकायदेशीरपणे जमून केवळ मनाई आदेशांचे उल्लंघन केले नाही तर पोलिस प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उघडपणे उल्लंघन केले. निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ पोहोचून कारवाई करीत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यामध्ये भिवंडी, कल्याण आणि आसपासच्या परिसरातील रहिवासी समाविष्ट आहेत. तसेच पोलिसांनी घटनेत वापरलेली लोखंडी शस्त्रे देखील जप्त केली. सदर आरोपी कोणाच्या इशाऱ्याने या ठिकाणी आले ? याचा तपास आचारसंहिता अधिकाऱ्यांनी पोलिसांमार्फत करावा,अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

Scanned with OKEN Scanner

पे० ठाणे वैभव दि० ०८/०१/२०२६

# भिवंडीत कोंबडपाड्यात शस्त्रांसह मद्यधुंद तरुणांचा गोंधळ

**भिवंडी:** भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक निमित्ताने शहरात आदर्श आचारसंहिता लागू असूनही शहरातील कोंबडपाडा गावदेवी मंदिरासमोर सार्वजनिक ठिकाणी मध्यरात्री दरम्यान 26 तरुण युवक शस्त्र बाळगत मद्यधुंद अवस्थेत आढळून आले. या प्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींमध्ये भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील तरुण युवकांचा समावेश असून ते रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कोणासाठी जमा झाले होते? याबाबत कोंबडपाडा परिसरात उलटसुलट चर्चा सुरु झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 6 जानेवारी 2026 रोजी रात्री 12:30च्या सुमारास भिवंडीच्या कोंबडपाडा परिसरातील गावदेवी मंदिरासमोर आणि आजूबाजूला काही तरुण मद्यधुंद स्थितीत जमले आणि त्यांनी गोंधळ घातला. याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले असता त्यांना 26 जण तरुण-युवक आरोपी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले. त्यांच्याकडे दोन जुन्या तलवारी आढळून आल्या. आरोपींच्या कृतींमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

निजामपुरा पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ पोहोचून कारवाई करीत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यामध्ये भिवंडी, कल्याण आणि आसपासच्या परिसरातील रहिवासी आहेत. पोलिसांनी घटनेत वापरलेली लोखंडी शस्त्रे देखील जप्त केली. हे आरोपी कोणाच्या इशाऱ्याने या ठिकाणी आले? याचा तपास आचारसंहिता अधिकाऱ्यांनी पोलिसांमार्फत करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. मुंबई इन्कलाब दि. 02/05/2024

# کونارک وکاس اگھاڑی کے انتخابی جلسے میں ہنگامہ، ۲۲؍افراد پر کیس درج

**بھیونڈی**، (خالد عبدالقیوم انصاری):

یہاں دو سیاسی پارٹیوں کے کارکنان کے درمیان کشیدگی انتہا کو پہنچ گیا ہے۔ بی جے پی رکن اسمبلی اور سابق میئر ولاس پاٹل کے حامیوں کے درمیان ٹکراؤ سے پورے علاقے میں تناؤ پیدا ہوگیا ہے۔ یہ واقعہ بدھ کی شب میں اس وقت ہوا جب کونارک وکاس اگھاڑی کے انتخابی جلسہ کے دوران ہنگامہ آرائی ہوئی۔ گومبڑ پاڑہ میں واقع گنپتی مندر کے احاطے میں کونارک وکاس اگھاڑی کی جانب سے جاری جلسے میں مبینہ طور پر بی جے پی کے ۱۰، ۱۲؍حامی زبردستی داخل ہوگئے، خواتین کے ساتھ نازیبا زبان استعمال کی اور انہیں دھمکیاں دیں۔ الزام ہے کہ ہنگامہ پولیس اہلکاروں کی موجودگی میں ہوا، تاہم ابتدائی طور پر پولیس نے کوئی زیادہ مداخلت نہیں کی جس کے باعث حالات مزید کشیدہ ہوگئے۔ بعد ازاں کونارک وکاس اگھاڑی کے حامیوں نے ۱۱۲؍نمبر پر فون کر اعلیٰ حکام کو اطلاع دی، جس کے بعد اضافی پولیس فورس موقع پر پہنچی اور حالات پر قابو پالیا گیا۔ واقعہ کے بعد دیر رات سابق میئر پرتبھا پاٹل اپنے حامیوں کے ہمراہ نظام پورہ پولیس اسٹیشن پہنچیں اور سخت کارروائی کا مطالبہ کیا۔ پولیس کی مبینہ تاخیر کے خلاف حامیوں نے پولیس اسٹیشن کے باہر احتجاج بھی کیا۔ بعد دونوں پارٹیوں کے حامیوں نے ایک دوسرے کے خلاف شکایت درج کرائی۔

پولیس نے فریقین کی شکایت کی بنیاد پر مقدمات درج کئے ہیں جن میں مجموعی طور پر تقریباً ۲۲؍افراد کو ملزم بنایا گیا ہے۔

Scanned with OKEN Scanner

दै. द. फ्री प्रेस जनरल

दि. ०८/०१/२०२६

# 26 booked for holding swords

**Bhiwandi:** In a serious breach of the Model Code of Conduct in force for the Bhiwandi Municipal Corporation elections, police have booked 26 persons for allegedly gathering in a public place while armed with swords and iron weapons and creating fear among residents late on Monday night. The incident took place around 12.30am near Gavdevi Temple in the Kombadpada area, where a group of youths was found creating a ruckus in an intoxicated state.

Scanned with OKEN Scanner

दै० नवशक्ती दि० ०८/०१/२०२६

# निवडणुकीनिमित्त ठाण्यात कडक बंदोबस्त

**ठाणे :** ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महानगरपालिका निवडणूक २०२६ शांततेत व निर्विघ्न पार पडण्यासाठी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाने सुरक्षा आणि प्रतिबंधक कारवाईचे अभूतपूर्व कवच उभारले आहे. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई करण्यात आली.



एमपीडीए कायद्यांतर्गत ४९ गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले, तर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२४ च्या कलम १२६, १२८ व १२९ अन्वये ११,५०८ प्रतिबंधक कारवाया नोंदवण्यात आल्या. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत ३०७ जणांवर हद्दपारची कारवाई, तर दारूबंदी कायद्यांतर्गत ५५८ कारवाया केल्या. नाकाबंदीमध्ये ₹२.१६ कोटी बेहिशोबी रोख रक्कम जप्त करण्यात आली. आयुक्तालयाने कोंबिंग ऑपरेशन आणि 'ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत २७ अग्निशस्त्रे, ३७ जिवंत काडतुसे आणि १४२ चाकू-सुरे जप्त केले. अवैध देशी-विदेशी व गावठी दारू, रु. १०.९२ लाख किमतीसह जप्त करण्यात आली.

अमली पदार्थांविरोधात २,९१९ गुन्हे दाखल, ३,१४४ आरोपींवर कारवाई आणि १,४९१ किलो गांजा, एमडी, हेरॉइनसह ₹७८.३५ कोटींचा मुद्देमाल जप्त केला. तणावग्रस्त भागात रूट मार्च, एरिया डॉमिनेशन आणि ड्रोन निगराणी सुरू आहे.

Scanned with OKEN Scanner